# स्फूर्तिदायी विचार





प्रकाशक
कार्यवाह, श्री सार्वजनिक गणेशोत्सव संस्था
केशवजी नाईकांच्या चाळी
गिरगांव, मुंबई ४०० ००४

मुद्रक
माधव द० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगांव
मुंबई ४०० ००४

प्रकाशन : १ ऑगस्ट २००४
पूनर्मुद्रण : १ ऑगस्ट २००५, सप्टेंबर २००५
नोव्हेंबर २००५, एप्रिल २००६, १ ऑगस्ट २००९

लोकमान्यांचे रेखाचित्र : व्हि. एन. ओके

www.1stganeshfestival.com



# निवेदन

लोकमान्य टिळकांवर आजपर्यंत अनेक पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत. या पुस्तिकेद्वारे लोकमान्यांनी व्यक्त केलेल्या विविध विषयांवरील विचारांचे संकलन करण्याचा आम्ही प्रयत्न केला आहे. अर्थात हे संकलन पूर्ण नव्हे. अजून अनेक विचार त्यांच्या लेखांतून वा भाषणांतून घेता येतील. यांतील बहुतांशी विचार लोकमान्य सार्वजनिक धर्मादाय न्यास, दापोली यांनी प्रकाशित केलेल्या 'लोकमान्य दैनंदिनी इ.स.२०००' मधून साभार घेतले आहेत.

या पुस्तिकेमुळे लोकमान्यांच्या थोर व्यक्तिमत्त्वाविषयी सर्वांना माहिती व्हावी व त्यांच्या समग्र साहित्याचे वाचन व्हावे ही इच्छा!

कार्यवाह,
श्री सार्वजनिक गणेशोत्सव संस्था



राष्ट्राच्या अभ्युदयाकरितां असे उत्सव असणे जरूर आहे, असें कोणासहि वाटल्यावांचून रहाणार नाही. कोणत्याहि लोकांत ऐक्याची वृद्धि होण्यास जीं अनेक साधनं असतात त्यांपैंकीचं एक उपास्यदैवत असणें हें एक कारण आहे....एका प्रांतांतच का होईना, पण वर्षातून दहा दिवस तरी एकाच देवतेच्या भजन-पूजनांत लोक निमग्न झाल्याने त्यांच्यांत ऐक्याची वृद्धि होणार नाही असे कोण म्हणेल?

चाकरी ती चाकरी तिचा अर्धा पगार वरीष्ठांचे बोलणे सोसण्याबद्दल व अर्धा पगार कामाबद्दल असे समजले पाहिजे.



धर्माची सत्यनिष्ठा, कर्णाची उदारता, भीमाचे बाहुबल, अर्जूनाचें हस्तकौशल्य इत्यादि गुणांचें कितीहि कौतुक करावेंसें वाटलें तरी भीष्माचा दृढनिश्चय आणि श्रीकृष्णाचें मुत्सद्दीपण या दोन गुणांपुढे इतर सर्व गुण फिके पडतात.

‘हिंदुस्थानात शेतकरी हा राष्ट्राचा आत्मा आहे. याच्यावरील मालिन्याचा पडदा जर दूर झाला तरच हिंदुस्थानचा उद्धार होईल. याकरिता शेतकरी आपला व आपण शेतकऱ्याचे असे आपणास वाटावयास हवे.’



‘प्रजा कितीही दुर्बळ असली तरी धैर्याने, एकजुटीने आणि निश्चयाने शस्त्रावीणही ती भारी होते ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे.’

आध्यात्मिक विचारांत मनुष्य कितीही गढून गेला तरी मध्यान्ह टळून गेल्यावर पोटांत क्षुधेची टोंचणी लागली म्हणजे हे सर्व विचार लटपटतात.

आपल्या राष्ट्राचा विचार करा; कामास लागा. नुसत्या आहारविहारासाठी मानवजन्म नाही.



हल्ली शिक्षण म्हणजे एक प्रकारची चाकरी करून भाकरी मिळविण्याचा धंदा झाला आहे! हें शिक्षण नव्हे, हमाली आहे; व त्यापासून राष्ट्राचा उत्कर्ष न होतां उलट अवनती होण्याचा संभव आहे.

इतिहासाचा योग्य उपयोग जाणून त्यापासून बोध घेता येईल, बुद्धीला श्रेयस्कर वळण लागेल, व आनुवंशिक संस्कार दृढ होऊन आपली बुद्धि भ्रष्ट होणार नाही अशाच दृष्टीने इतिहासाचा अभ्यास झाला पाहिजे.



गुळगुळीत कागदावर रंगीबेरंगी बुळबुळीत मजकूर छापून लोकांचें रंजन करणें हें काही वर्तमानपत्रकर्त्यांचें मुख्य कर्तव्य नव्हें.

तुरुंगांत गेलों तरी बेहत्तर; पण माझ्या सदसद्विवेकबुद्धिविरुद्ध मी अन्यायाला व जुलुमाला मदत करणार नाही.

सर्वव्यापी ईश्वराकडे जाण्यास ईश्वराने एकच वाट ठेविली आहे. हें म्हणणे ईश्वराच्या घराला रानटी मनुष्याच्या घराप्रमाणे एकच दरवाजा आहे, असें म्हणण्याइतकेंच उपहासास्पद आहे.



ज्याला इंग्रजींत 'कॅरेक्टर' म्हणतात ते चारित्र्य-दानत–राष्ट्रांतील लोकांत असली पाहिजे, त्यांच्यांत करारीपणा असला पाहिजे, आणि 'मी राष्ट्राकरितां मरण्यासदेखील तयार आहे' अशी बुद्धि राष्ट्रांतील तरुणांत उत्पन्न झाली पाहिजे. हें ज्या शिक्षणाने होईल तें 'राष्ट्रीय शिक्षण.'

औद्योगिक दृष्ट्या राष्ट्राच्या उन्नतीचें खरें लक्षण म्हटलें म्हणजे निरनिराळ्या धंद्यांच्या व शिक्षणाच्या तरबेज माणसांनी निरनिराळे धंदे स्वतंत्रपणे चालवून त्यांत प्रावीण्य मिळविणें हें होय.

गायनाभिरुचि ही मनुष्याच्या अंत:करणांतील एक नैसर्गिक व उदात्त वृत्ति असून तिची वृद्धि झाल्याने त्याच्या एकंदर स्वभावावर व आचरणावर उदात्त परिणाम झाल्याशिवाय राहावयाचा नाही.

समाजाच्या चालीरीति पालटण्यास समाजाच्या खऱ्या पुढाऱ्याचें आचरण जितकें कारण होतें, त्याच्या शतांश, नव्हे सहस्त्रांशहि कायद्यांचा उपयोग होत नाही.



हजारो लोक व्याख्यानास येतात, टाळ्या वाजवितात, शब्द मानतात, म्हणून राष्ट्र पुढच्या कठिणतर मार्गास तयार झाले आहे असे कोणी समजेल तर तो फसेल. पुढील पायरी अधिक महत्त्वाची आहे. लोकांची तयारी मोजण्याचे माप सभेतील गर्दी व टाळ्यांचा कडकडाट नव्हे, हा फक्त उज्ज्वल श्रीगणेशा आहे.

ज्या देशांत केवळ उदरभरणासक्त, काबाडकष्ट करणारे व क्षणिक सुखांत धन्यता मानणारे लोक असतात तो देश पशूंना योग्य अशा गुलामगिरीत लोळत पडणार.



लोकांत जागृति, कळकळ व संघशक्ति उत्पन्न करणें हेंच वर्तमानपत्रकार या दृष्टीनें आमचें मुख्य कर्तव्य आम्ही समजतों. आम्ही केसरीत जे लेख लिहितों ते केवळ राज्यकर्त्यांकरितां नसून आमच्या मनांतले विचार, आमच्या मनांतील तळमळ, किंवा जळफळ सर्व मराठी वाचकांच्या मनात उतरावी एवढ्याकरितांच आहेत; व आमच्या लेखांचा जर असा परिणाम होत नसला तर आमचे श्रम फुकट गेले असें आम्ही समजूं.

विचार, उच्चार व आचार या त्रयींची संगत घातल्याखेरीज सामाजिक सुधारणा होत नाही.



ज्याला मोक्षप्राप्ति पाहिजे असेल त्यास आपल्या देशबांधवांची काळजी केल्याखेरीज गत्यंतर नाही. देश आणि देव हे दोन मानणारे जे लोक आहेत ते सर्व प्रकारें धर्मभ्रष्ट आहेत असें मी समजतों.

खरा देशाभिमान जर कशांत असला तर तो यांतच आहे कीं, ज्यांमुळे आपल्या देशाची व लोकांची निकृष्टावस्था झाली तीं कारणें शोधून काढून त्यांच्या प्रतिकारार्थ उद्योग करावयाचा.

केवळ दाईच्या स्तनपानावर जशी बालकांची नीट जोपासना होत नाहीं, त्याप्रमाणेंच परकी भाषेंतून दिलेल्या उष्ट्या व नि:सत्त्व शिक्षणानें मुलांचीं मनें कधीहि सुसंस्कृत व्हावयाची नाहीत.



असा कोणताही धंदा किंवा आश्रम नाहीं की, लबाडांनी किंवा अयोग्य पुरुषांनी त्यांत आपला प्रवेश करून घेतला नाहीं; मग तो राज्य करण्याचा धंदा असो की भीक मागण्याचा धंदा असो.

आपल्या आवडत्या ध्येयाकरितां आपलें आयुष्य खर्च करण्यास तयार होणें व आपल्या कार्यक्रमांत प्राप्त होणारी दु:खें बिनतक्रार सोसणें यांतच खरा पुरुषार्थ आहे; एरवीं ध्येयांची कोरडी चर्चा करीत बसणें हा नुसता चावटपणा होय.



समाजाचे पुढारी होण्यास विद्वत्तेपेक्षां सदाचरण, धर्मनिष्ठा आणि स्वार्थत्याग यांची अधिक जरुर लागत असते.

मी स्वत: आशावादी नसून प्रयत्नवादी आहे. भोवतालची परिस्थिति कितीहि बिकट असली तरी आपल्या हातून होईल तें व आपणांस पचेल तें कांही ना कांहीं तरी नेहमी करीत असावे; मग त्याचा परिणाम केवढा कां क्षुद्र असेना.

गरिबांच्या चुकांपेक्षा मोठ्यांचींच पातकें लोकांस अधिक भोगावी लागतात.



मद्यप्राशन वेदांविरुद्ध, कुराणाविरुद्ध व बायबलविरुद्धहि आहे. मद्यपाननिषेधाचे चळवळीस परमेश्वराचा पाठिंबा खास आहे.

जोपर्यंत मराठी भाषेचा अभिमान बाळगून सर्व दिशेने तिची अभिवृद्धि करणें आपलें कर्तव्य आहे असं महाराष्ट्रांतील सुशिक्षित लोकांस वाटत नाही, तोपर्यंत महाराष्ट्रभाषा चांगल्या नांवारूपास येण्याची आशा नको.

हिंदुधर्म वेदप्रणीत आहे, आणि वेदांत अस्पृश्यतेला कोठेंहि थारा नाही. तेव्हा आपल्यापैकीं कांहीजणांस अस्पृश्य लेखणें हें मी देवाचे घरी गुन्हा समजतों.

ज्याला देशाची सुधारणा करावयाची असेल त्याने प्रथमत: त्या देशांतील विद्यार्थ्यांस चांगलें वळण लावण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

आमची हल्ली अवनति झाली आहे ती हिंदुधर्मामुळें नव्हें, तर धर्म अजिबात सुटल्यामुळे झाली आहे.



सरकारच्या आवडीकरितां कांही आम्ही पत्रें काढलीं नाहींत व सरकारवर कडक टीका केल्यानें त्यांचा रोष आमच्यावर झाला तर त्याची आम्हांस परवाहि नाहीं. सरकारच्या जुलमी राज्यपद्धतीवर जर कडक टीका करावयाची नाहीं व ती पद्धत परिणामीं लोकांस व राज्यकर्त्यांस जाचेल असें निर्भीडपणें म्हणावयाचें नाही तर वर्तमानपत्र काढावें तरी कशाला?

मृत्यूस भितां? व त्याने कोणास गांठलें म्हणून दु:ख करितां? माझेबद्दल मी तुम्हांस सांगतों की, मृत्यू जरी मजकडे आला तरी मी त्याला माझें काम संपेतोपर्यंत बाहेर जाण्यास सांगेन !



आठ-दहा दिवस उत्साहानें जर काढतां येत नाहीत व त्या उत्सवाप्रीत्यर्थ थोडकेसें द्रव्य खर्चण्याचें जर सामर्थ्य नाही, तर तें राष्ट्र जिवंत असून मेल्यासारखेंच आहे. ह्या गोष्टीला उधळपट्टी म्हणणारे म्हणोत; पण कष्टमय संसाराची यात्रा सुखाची व शांतीची होण्यास असले खर्च आवश्यक आहेत.

आमच्या विद्यार्थ्यांच्या शारीरिक शिक्षणाची आम्ही फार काळजी घेतली पाहिजे.



हक्क संपादन करणें जितकें महत्त्वाचें तितकेंच मिळालेले हक्क सांभाळून ठेवण्याचें व हक्काची पायमल्ली करणारास योग्य शासन करण्याचें काम महत्त्वाचें आहे.

पृथ्वीवरील सर्व धर्मांत अत्यंत सहिष्णु, ज्यानें त्याने आपापल्या धर्मानें वागावें व सर्वांशीं प्रेमानें वागावें असें सांगणारा जर कोणता धर्म असेल तर तो हिंदुधर्म आहे.



आपण जी राजकीय चळवळ करू तीत अपयश आले असता ती सहज क्रमप्राप्त गोष्ट आहे अशी मनाची वृत्ती राहिली पाहिजे. यश येणार नाही असे धरून चालले पाहिजे.

सार्वजनिक काम करणारास लोकांची टीका सहन करण्याचें शिक्षण आवश्यक आहे.

एखादी गोष्ट मनाला पटली तरी ती बोलून दाखविण्याला एक प्रकारचे धैर्य लागते आणि हे धैर्य ईश्वराने तुम्हांला द्यावे अशी माझी प्रार्थना आहे.



ज्यास राजकीय चळवळींत पडावयाचें असेल त्यानें सरकारच्या पैशास पिसाळलेल्या कुत्र्याच्या विषाप्रमाणे समजलें पाहिजे.

स्वाभिमान, हुरूप, स्वराज्यनिष्ठा हाच राष्ट्राचा खरा जीव होय. आणि हा जिवंतपणा जेथें वसत आहे त्या ठिकाणीं सुईच्या मागें जसा दोरा तद्वत् सामाजिक सुधारणाहि मागोमाग येत असतात.

जुलूम सहन करणें यांत स्वार्थ नाही आणि परमार्थहि नाहीं; ही पशुवृत्ति होय.



सकाळीं मी जागा झाल्यापासून रात्रीं झोपीं जाईपर्यंत मातृभूमीच्या चिंतनावांचून माझा एक क्षणहि जात नाहीं. हीच माझी संध्या, हेंच त्रिसुपर्ण व हाच ब्रह्मयज्ञ !

गणिताची ज्याला गोडी नाहीं किंवा गणितांत ज्याचें डोकें शिरत नाहीं त्याची विचारसरणी एक प्रकारें अपक्व राहते. गणिताच्या योगानें विचारांची सांखळी अत्रुटित व सुसंबद्ध होते.



जगांत कोणत्याहि देशांत गेला व कांहीहि उद्योग करीत असलांत तरी हिंदुस्थानचें प्रतिनिधी म्हणून नित्य वागत व राहात जा, जग तुमच्यावरूनच तुमच्या देशाची किंमत ठरवील.

राजकारणी पुरुषाचे अंगात दोन गुण असावे लागतात एक तर त्याच्या हृदयात प्रखर आग पेटलेली पाहिजे व दुसरा म्हणजे त्या हृदयाच्या वरच्या बाजूस डोके बर्फासारखे थंड असले पाहिजे. हे दोनही गुण एकसमयावच्छेदेकरून नेहमी ज्या पुरुषाजवळ उत्कटतेने वास करीत असतील तो पुढारी होण्यास योग्य होय.



ज्ञान हें तीक्ष्ण व शक्तिमान् असून त्याला दुसऱ्या सहाय्याची अपेक्षा नाहीं. हत्ती एवढा मोठा, तरी त्याला ज्ञानानें मनुष्यानें आपल्या कह्यांत ठेविलें आहे.

माझें तत्त्व असें आहे कीं जनतेच्या पुढें तर जावयाचें पण फार पुढें मात्र जावयाचें नाही. संघशक्ति नाहीं तोपर्यंत नुसत्या उच्च ध्येयांकडे पाहून काय करणार?

आपल्या शिक्षणाचा जो देशासाठी उपयोग करतो तोच खरा सुशिक्षित, बाकीचे सारे भारवाहीच समजले पाहिजेत.



समाजांतील प्रत्येक पुरुष किंवा मूल याला केवळ लिहिणें-वाचणेंच नव्हे तर नागरिकत्वाचें हक्क व जबाबदारी कळण्याचें शिक्षण मिळेल तेंच राष्ट्र खरें.

मला मोक्षाची अपेक्षा नाहीं. हा देह केव्हां तरी जाणारच आहे; मी ईश्वरापाशीं इतकेंच मागेन कीं, जोपर्यंत माझे तेहतीस कोटी देशबांधव पारतंत्र्याच्या नरकांत आहेत तोपर्यंत मला एकट्याला मोक्ष नको, इतकेंच नव्हे तर देशाचा उद्धार होईपर्यंत मला याच भूमींत हल्लीपेक्षांहि जास्त बुद्धिसामर्थ्य व शक्ति देऊन वारंवार जन्माला घाल.



आपल्या थोर पूर्वजांस विसरून जाऊन कोणतेंही राष्ट्र उदयास आलें नाही व येणेंही शक्य नाहीं, असा सर्वसामान्य ऐतिहासिक सिद्धान्त आहे याचेंच श्रीशिवजयंत्युत्सवासारखे उत्सव हें दृश्य स्वरूप होय.

राजकारण हा विषय विचारांच्या तीव्रतेने मनाला भ्रष्ट करणारा आहे. ते मन समतोल व शांत राखण्याकरिता दररोज किंवा वेळ न मिळाल्यास निदान तीन-चार दिवसांनी तरी घटका दोन घटका नेहमीच्या सर्व व्यापातून मन अगदी अलग करून शक्य तितके एकाग्र व शांत ठेवण्याचा परिपाठ असावा. यायोगे अनेक प्रमादांपासून बचाव होऊन चित्तशुद्धी राहते.



श्रीशिवाजी महाराजांची ‘गोब्राह्मणप्रतिपालक’ म्हणून ख्याती आहे. पण विचार करा कीं, त्यांनी काय गोशाळा स्थापन केल्या होत्या की, ब्राह्मणभोजनें सुरुं केलीं होतीं?

यांपैकी कोणतीही गोष्ट न करतांहि शिवाजीमहाराजांस ‘गोब्राह्मणप्रतिपालक’ असें म्हणतात, यांतील मर्म काय? देशाची उन्नति करणें यासारखें दुसरें कोणतेंही गोरक्षण नाहीं हें त्यांतील मर्म होय.

देशकार्य हें केवळ बुद्धीवर अवलंबून नसून दीर्घोद्योगावर व स्वार्थत्यागावर अवलंबून आहे.



अंतर्गत जोम, कडकडीत स्वाभिमान व स्वार्थत्याग हे गुण ज्या राष्ट्रांत जागृत असतात, तें राष्ट्र कितीहि संकटें आलीं तरी उदयास येतें.

कोणी तुम्हांला सकाळ संध्याकाळ नळीवाटे जेवण घालूं लागला तर तुम्हांला रुचेल काय? रुचि ही अन्नांत नाही. ती स्वकष्टांत आहे. स्वकष्टानें मिळविलेलें अन्न जास्त गोड लागतें. तसेंच स्वराज्य व परराज्य यांचें आहे.

भित्र्या माणसास ज्याप्रमाणें अंधारांत भुतें नाचलेलीं दिसतात, त्याचप्रमाणें निरुद्योगी व निरुत्साही माणसाचे वाटेंत अडचणींचे डोंगर नेहमी उभे असावयाचेच.आपल्या स्वभाषेंत लोकांस उपदेश करुन व त्यांच्यांत मिसळून वागून त्यांच्या मनांत सद्धर्माचा, सदाचाराचा, सदाभिमानाचा अंकुर उत्पन्न करणें हेंच स्वभाषाभिवृद्धीचे मुख्य बीज आहे.

मतभेद सर्वथा टाळणें अशक्य आहे; कारण विचारापेक्षां स्वभावावरच मतभेद प्रायश: अवलंबून असतात.



खरी सुधारणा होण्यासाठी शास्त्री व पंडित यांस नव्या परिस्थितीचे आणि नव्या सुशिक्षितवर्गास हिंदु धर्मातील तत्त्वांचे व परंपरेचे ज्ञान करून दिले पाहिजे. दोघांतही एकेक प्रकारची उणीव आहे व ती उणीव भरून काढणे हे खऱ्या सुधारकांचे कर्तव्य आहे.

कोणतेंहि नवीन मत घ्या; तें बद्धमूल होण्यास समाजांत पूर्वी रूढ झालेल्या मतांत चळवळ किंवा खोदवाखोदवी होणें जरूर आहे.



केल्याविण कांहीं होत नाहीं" हा सृष्टीचा नियम लक्षांत आणून तुम्ही मात्र निष्कामबुद्धीनें कर्ते व्हा म्हणजे झालें. निव्वळ स्वार्थ-परायण-बुद्धीनें संसार करून थकल्याभागल्या लोकांच्या कालक्रमणार्थ, किंवा संसार सोडून देण्याची तयारी म्हणूनहि, गीता सांगितलेली नसून संसारच मोक्षदृष्ट्या कसा केला पाहिजे व मनुष्यमात्राचें संसारांतलें खरें कर्तव्य काय याचा तात्त्विक दृष्ट्या उपदेश करण्यासाठी गीताशास्त्राची प्रवृत्ति झालेली आहे. म्हणून पूर्ववयांतच गृहस्थाश्रमाचें किंवा संसाराचें हें प्राचीन शास्त्र जितक्या लवकर समजून घेणें शक्य असेल तितक्या लवकर प्रत्येकानें समजून घेतल्याखेरीज राहूं नये, एवढीच आमची शेवटीं विनंती आहे.

